**ठळक बातम्या**

- मोसमी पावसाचं आगमन लांबणीवर पडल्यामुळे देशभर खरीपाच्या पेरण्यांत घट

- महाराष्ट्रात अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाबाबत बदर समितीच्या अहवालावर सूचना, हरकती विचारात घेऊनच व्यापक चर्चेअंती अंतिम निर्णय घेण्याचं मुख्यमंत्र्यांचं विधानसभेत आश्वासन

- विधानपरिषद उपसभापतीपदासाठी सचिन अहिर यांचा महायुतीच्या पाठिंब्यावर अर्ज दाखल/ महाविकास आघाडीकडून शिक्षणतज्ञ जगन्नाथ अभ्यंकर यांचा अर्ज दाखल

- सलग नवव्या तिमाहीसाठी विविध लघु बचत योजनांचे व्याजदर जैसे थे

**आणि**

- फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत जर्मनीचा पराभव / मोरोक्को, पॅराग्वे आणि ब्राझीलची बाद फेरीत धडक

**<><><><><>**

मान्सूनच्या पावसाचं आगमन लांबणीवर पडल्यामुळे देशात यंदा खऱीप पिकाची पेरणी कमी प्रमाणात झाल्याचं कृषी मंत्रालयानं म्हटलं आहे. जून महिन्यात १८२ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे, गेल्यावर्षी याच काळात २३६ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली होती, त्यामुळे गेल्यावर्षीच्या तुलनेत यावर्षी पेरणीत २३ टक्के घट झाली आहे. भात, तेलबिया, भरड धान्य, कडधान्य, कापूस या सर्व पिकांवर पाऊस उशीरा आल्यामुळे परिणाम झाल्याचं कृषी मंत्रालयानं सांगितलं.

भात पेरणीत २५ टक्क्यापेक्षा जास्त घट झाली आहे, कडधान्यात ३० टक्के, तेलबिया ५० टक्के तर कापूस लागवडीत ३४ टक्के घट झाली आहे.

दुसरीकडे उसाच्या लागवडीत ५७ टक्के वाढ झाल्याचं कृषी मंत्रालयाने सांगितलं.

**<><><><><>**

**अनुसूचित** जातींच्या उपवर्गीकरणाबाबत बदर समितीच्या अहवालावर सूचना, हरकती विचारात घेऊनच व्यापक चर्चेअंती अंतिम निर्णय घेऊ, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत दिली. यात कोणावरही अन्याय होणार नाही, असं ते म्हणाले. उपवर्गीकरणाला विरोध नोंदवत या विषयावर बोलू देण्याची मागणी विरोधकांनी केली. अध्यक्षांनी त्यांना जागेवर बसायची सूचना केली, मात्र विरोधकांनी बोलू देण्याची मागणी लावून धरली आणि ती मान्य न झाल्याने सभात्याग केला.

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमात सुधारणा विधेयक विधानसभेत सादर झालं. विकास करार रद्द, निरस्त किंवा समाप्त झाला तर मुद्रांक शुल्काचा परतावा किंवा सवलत दिली जाणार नाही अशी तरतूद या विधेयकात आहे.

**<><><><><>**

विधानपरिषदेच्या उपसभापतीपदाच्या निवडणुकीसाठी सचिन अहिर यांनी आज उमेदवारीअर्ज दाखल केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार, नीलम गोऱ्हे, चंद्रकांत पाटील, संजय राठोड, संजय शिरसाट आदी नेते यावेळी उपस्थित होते. अहिर हे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आहेत, मात्र त्यांना महायुतीनं निवडणुकीसाठी पाठिंबा दिला आहे. विधानपरिषदेच्या उपसभापतीपदाची निवडणूक उद्या होणार आहे. त्यासाठी महाविकास आघाडीकडून शिक्षणतज्ञ जगन्नाथ अभ्यंकर यांनी अर्ज दाखल केला. या अर्जांची आता छाननी होत असून, त्यानंतर आवश्यकता भासली तर निवडणूक होईल.

**एमपीएससी** अर्थात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत होणारी भरती प्रक्रिया अधिक जलद, पारदर्शक आणि कार्यक्षम होण्यासाठी सीबीटी अर्थात संगणक आधारित परीक्षा पद्धतीचा वापर करण्याचा निर्णय सरकारनं घेतल्याची माहिती, सामान्य प्रशासन विभाग मंत्री आशीष शेलार यांनी दिली. ऑफलाईन परीक्षा घेण्यासाठी शाळा आणि महाविद्यालयांवर अवलंबून राहावं लागतं, केंद्र सरकार, विविध राज्यं, बँका आणि इतर संस्थांच्या स्पर्धा परीक्षा याच काळात होत असल्याने परीक्षा केंद्रं उपलब्ध नसतात. त्यामुळे सीबीटी पद्धत अधिक उपयुक्त आहे, असं शेलार म्हणाले.

**<><><><><>**

विधानपरिषदेतले आमदार सचिन अहिर यांनी आज एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालच्या शिवसेनेत प्रवेश केला. विधान परिषद उपसभापती पदासाठी आज अर्ज भरण्यापूर्वी अहिर यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सर्व पदांचा राजीनामा दिला.

सचिन अहिर हे धनुष्यबाणाच्या चिन्हावर निवडून आलेले असून ते शिवसेनेचेच आमदार आहेत असा दावा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे. ते आज दुपारी मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ६ खासदार शिवसेनेत आल्यानंतर आहिर यांच्या प्रवेशानं शिवसेनेची ताकद आणखी वाढेल असं ते म्हणाले.

**<><><><><>**

राज्य सरकारनं पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी मांडलेल्या ९७ हजार ७०६ कोटी ४० लाख रुपयांच्या सर्व पुरवणी मागण्या विधानसभेनं आज मंजूर केल्या. या मागण्यांवरची चर्चा काल सभागृहात सुरू झाली होती, ती आज पुढे नेण्यात आली. या चर्चेला मंत्री शिवेंद्रराजे भोसले आणि माधुरी मिसाळ यांनी उत्तर दिलं. त्यानंतर सर्व विभागांच्या पुरवणी मागण्या आवाजी मतदानानं मंजूर झाल्या.

**<><><><><>**

सलग नवव्या तिमाहीसाठी सरकारनं विविध लघु बचत योजनांचे व्याजदर जैसे थे ठेवले आहेत. उद्या ते ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत ही तिमाही आहे. केंद्रीय अर्थ मंत्रालयानं आज ही माहिती दिली. सुकन्या समृद्धी योजनेचा व्याजदर ८ पूर्णांक २ दशांश टक्के आहे. तर चालू तिमाहीत तीन वर्षांच्या मुदत ठेवींवरचा व्याजदर ७ पूर्णांक १ दशांश टक्क्यांवर कायम आहे.पीपीएफ अर्थात पब्लिक प्रॉव्हिडंट फंडाचा व्याजदर ७ पूर्णांक १ दशांश टक्के तर एनएससी अर्थात नॅशनल सेव्हिंग सर्टिफिकेटचा ७ पूर्णांक ७ दशांश टक्क्यावर कायम आहे.

**<><><><><>**

फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत जर्मनीचा धक्कादायक पराभव झाला असून मोरोक्को, पॅराग्वे आणि ब्राझीलने बाद फेरीत धडक मारली आहे. अमेरिकेतील बोस्टन इथं झालेल्या अटीतटीच्या सामन्यात पॅराग्वेने जर्मनीचा पेनल्टी शूटआऊटमध्ये ४-३ असा पराभव केला. तत्पूर्वी निर्धारित वेळेत दोन्ही संघ १-१ अशा बरोबरीत होते. दुसरीकडे मेक्सिकोतल्या ग्वादालुपे इथं झालेल्या सामन्यात मोरोक्कोनं नेदरलँड्सवर पेनल्टी शूटआऊटमध्ये ३-२ अशी मात केली. हा सामनाही निर्धारित वेळेत १-१ असा बरोबरीत सुटला होता. तसेच ह्युस्टन इथं झालेल्या सामन्यात ब्राझीलनं जपानचा २-१ असा पराभव करत बाद फेरीतलं आपलं स्थान निश्चित केलं आहे.

दरम्यान भारतीय वेळेनुसार आज रात्री साडेदहा वाजता टेक्सास इथं आयव्हरी कोस्ट आणि नॉर्वे यांच्यात सामना रंगणार आहे.

**<><><><><>**

विद्यार्थ्यांनी शिक्षणाचा उपयोग समानता असलेल्या समावेशी समाजाच्या उभारणीसाठी करावा, असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. त्या आज विशाखापट्टणम इथं केंद्रीय आदिवासी विद्यापिठाच्या दीक्षांत समारंभात बोलत

होत्या. आदिवासी भाषा, आणि बोलींचं जतन करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. हा सांस्कृतिक ठेवा जपण्यासाठी हे विद्यापीठ करत असलेल्या कार्याची त्यांनी प्रशंसा केली…

**होल्ड - बाईट - राष्ट्रपती**

**<><><><><>**

जपानच्या प्रधानमंत्री सानाए ताकाइची उद्या संध्याकाळपासून तीन दिवसांच्या भारतदौऱ्यावर येत आहेत. ते नवी दिल्लीत होणाऱ्या सोळाव्या भारत-जपान वार्षिक शिखरपरिषदेला उपस्थित राहणार आहेत. दुसऱ्या दिवशी राष्ट्रपती भवनात ताकाईची यांचे औपचारिक स्वागत केलं जाईल. त्यानंतर त्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासोबत द्विपक्षीय संबंधांचा आढावा घेण्यासाठी आणि सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी चर्चा करतील. या चर्चेनंतर सामंजस्य करार होतील. 'भारत-जपान बिझनेस फोरम'मध्ये सहभागी होणार आहेत.

**<><><><><>**

अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाविरोधात आज मुंबईत मोर्चा निघाला. सर्वपक्षीय अनुसुचित जातीप्रवर्गाच्या संघटना या मोर्चात सहभागी झाल्या होत्या. राज्यभरातून या मोर्चासाठी हजारो कार्यकर्ते आले होते. या मोर्चाला मेट्रो सिनेमापासून सुरुवात झाली आणि आझाद मैदानावर त्याचं सभेत रुपांतर झालं. यात रिपब्लिकन सेनेचे अध्यक्ष आनंदराज आंबेडकर, माजी मंत्री राजकुमार बडोले, बबनराव घोलप, जोगेंद्र कवाडे, राजेंद्र गवई, डॉ. सुरेश माने, तसंच सिध्दार्थ खरात, ज्योती गायकवाड, संजय मेश्राम, बालाजी किनिकर, यांच्यासह सर्वपक्षीय आमदार सहभागी झाले होते. या सभेत विविध सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी उपवर्गीकरणाच्या प्रस्तावाला तीव्र विरोध दर्शवला.

**//<><><><><>//**